**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

## विद्यापीठाच्या जीवतंत्रज्ञान विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रशांत ठाकरे यांचा महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री ना.श्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते सत्कार

अमरावती -

वन्यजीव अन्वेषणात मदत व डी.एन.ए. ॲनॅलिसीस तसेच राज्य गुन्हे अन्वेषणाच्या आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन व मदत केल्याबद्दल संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या जीवतंत्रशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रशांत ठाकरे यांचा महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री ना.श्री दिलीप वळसे पाटील यांचे शुभहस्ते स्मृतिचिन्ह व गौरव प्रमाणपत्र देवून आभासी पद्धतीने सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभ रिजनल फॉरेन्सिक सायन्स लेबॉरटरी, नागपूर यांचेवतीने आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आला होता. समारंभाला अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.श्री उद्धव ठाकरे, दुग्धविकास व पशुसंवर्धन मंत्री ना.श्री सुनिल केदार, उर्जा मंत्री ना.श्री नितीन राऊत, न्याय प्रयोगशाळेचे संचालक श्री संदीप बिश्नोई आदी ऑनलाईन उपस्थित होते.

डॉ. प्रशांत ठाकरे यांनी आजपर्यंत वन्यजीव गुन्ह्याच्या जवळपास एकतीस प्रकरणांचे डी.एन.ए. ॲनॅलिसीस करुन दिलेले असून वन्य अधिकाऱ्यांना वेळोवेळी वन्यजीवाचे अवशेष डी.एन.ए. ॲनॅलिसीसकरिता हाताळण्याचे प्रशिक्षण सुद्धा दिले आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून मुख्यमंत्री ना.श्री उद्धव ठाकरे यांनी सुद्धा त्यांचे कौतुक केले.

डॉ. प्रशांत ठाकरे सध्या विद्यापीठातील कोविड प्रयोगशाळेचे नोडल अधिकारी असून प्रयोगशाळेने आतापर्यंत चार लक्षांचेवर नमून्यांच्या चाचण्या केल्या आहेत. सदर प्रयोगशाळेने अमरावती जिल्ह्यामध्ये कोविड - १९ च्या व्यवस्थापनेमध्ये अत्यंत मोलाची भूमिका बजावली असून कार्यतत्परतेने चाचण्या झाल्यामुळे अनेक लोकांना वेळेवर उपचार करणे शक्य झाले.

डॉ. प्रशांत ठाकरे यांच्या सत्काराबद्दल विद्यापीठाच्या नावलौकिकात भर पडली असून कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, जीवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगावकर, कोविड प्रयोगशाळेच्या तांत्रिक अधिकारी डॉ. निरज घनवटे तसेच विद्यापीठातील सर्व प्राधिकारणींचे सदस्य, संवैधानिक अधिकारी, प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी याशिवाय प्रयोगशाळेतील सर्व सहकारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २६/१०/२०२१.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी